<u>**नियमित दिवाणी दावा क्र. ४५/२०२२ मधील निशाणी ८० खालील आदेश**</u>
<u>**(CNR No. - MHRT08-000348-2022)**</u>

वादीने सदरचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. ०५ – शेवंती धोंडू येलोंडे (लग्नापूर्वीची सुंदरा महादेव मते) यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात यावा याकरीता दाखल केलेला आहे.

०२. इतर प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर अर्ज नामंजूर करण्यात यावा, असे म्हणणे दाखल केले आहे. सदर मयताच्या प्रस्तावित प्रतिवादींना नोटीस काढण्यात आली असता, नोटीस मिळुनही ते हजर न झाल्याने त्यांचेविरुध्द अर्ज एकतर्फा चालविण्यात आला.

०३. वादी व इतर प्रतिवादींना ऐकले. अभिलेख पाहिले.

०४. प्रस्तुतचा दावा हा ठराव व सरस–निरस–मानाने वाटप व स्वतंत्र कब्जासाठी दाखल करण्यात आला आहे. निशाणी क्रमांक ७९ कडील शेवंती धोंडु वेलोंडे यांचे मृत्यूप्रमाणपत्र पाहिले असता, त्यांचा मृत्यू दिनांक २९/०२/२०२४ रोजी झाल्याचे दिसुन येते. सदर मयत प्रतिवादीचे आडनाव दाव्यात व प्रस्तुत अर्जात *येलोंडे* असे नमुद असुन मृत्यूप्रमाणपत्रात मात्र ते *वेलोंडे* असे नमुद असल्याचे दिसुन येते. त्याबाबत इतर प्रतिवादी यांनी कोणतेही हरकत मांडलेली नाही. प्रस्तावित वारस यांनी देखील संधी मिळुनही सदर अर्जावर म्हणणे मांडुन कोणतीही हरकत घेतलेली नाही. वादीने सदर अर्जासोबत शपथपत्र सादर केले असुन त्यामध्ये प्रतिवादी क्र. ०५ शेवंती धोंडु येलोंडे हिचा मृत्यू २९/०२/२०२४ रोजी झाल्याचे शपथेवर कथने केले आहे. त्यामुळे ते नाकारण्यास कोणतेही कारण नाही.

०५.        सबब, दाव्याचे स्वरुप पाहता, सदर मयत प्रतिवादीचे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. त्यासाठी झालेला विलंब माफ करणे न्यायोचित आहे. सबब, पुढील आदेश पारीत करण्यात येतो–

**आदेश**

१. अर्ज निशाणी क्रमांक ८० हा एकूण रक्कम रुपये ३००/– (रक्कम रुपये तीनशे मात्र) इतकी खर्चाची रक्कम न्यायालयात भरण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. आदेशान्वये वादीने पुढील तारखेस किंवा त्यापुर्वी पुर्तता करावी.

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.11.14 11:41:57 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**दि. १०/११/२०२५**                **दिवाणी न्यायाधीश क. स्तर देवरुख,**

**स्थळः देवरुख**                **जि. रत्नागिरी.**

-: C E R T I F I C A T E :-

I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S. A. Bhale |
| Court Name | : | Civil Judge,(J.D.) & .M.F.C., Deorukh |
| Date of Decision | : | 10/11/2025 |
| Order signed by Presiding Officer on | : | 10/11/2025 |
| Order uploaded on | : | 14/11/2025 |